| | | |
|---|---|---|
| सत्यमेव जयते | **महाराष्ट्र शासन - सार्वजनिक आरोग्य विभाग**<br>**राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,**<br>डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१ | |

| | | |
|---|---|---|
| उपसंचालक आरोग्य सेवा<br>(आमाजिआ)<br>तथा उपमुख्य निबंधक<br>(जन्म व मृत्य) महाराष्ट्र राज्य | | संकेतस्थळ - arogya.maharashtra.gov.in<br>कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०<br>मा.सं. विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०<br>ई-मेल crs_d83@yahoo.com |

जा.क्र.आमाजिआ/कक्ष-८३/उशिरा नोंद सुधारित आदेश/3497-3737/१८
दिनांक:-26/5/२०१८

प्रति,
जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु
जिल्हा परिषद ........... (सर्व)

विषय :- जन्म-मृत्यू घटनांच्या उशिरा नोंदणी संदर्भात सुधारीत आदेश.

संदर्भ :- क्रं.जमृनों/२०१४/प्र.क्रं.२२१.कु.कु, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक ०३ एप्रिल २०१८ चे पत्र.

उपरोक्त विषयान्वये व संदर्भाकिंत पत्रानुसार या कार्यालयाचे पत्र क्रं.५०४-३८, दिनांक २०/०१/२०१४ च्या पत्राची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

सदरच्या सूचना आपल्या जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील निबंधक, जन्म-मृत्यू यांना पाठवाव्यात.

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत माहितीस्तव -
मा. अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, १०वा मजला, बी-वींग, गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, नवीन मंत्रालय, मुंबई.
प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी -
उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे ............. (सर्व)

राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी, कार्यालय, पुणे

डॉ. पी. एस. पवार
एम.एस.
उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५५५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
ई-मेल : crs_d83@yahoo.com
इ-मेल : sbhivs@pn3.vsnl.net.in
डॉ.नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे-१

जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/उशिरा नोंद सुधारीत आदेश/ 504-38 /१४, दिनांक:- 2 जानेवारी २०१४

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी तथा
जिल्हा निबंधक जन्म व मृत्यु,
जिल्हा परिषद .............(सर्व)

विषय :- जन्म-मृत्यु घटनांच्या उशिरा नोंदणी संदर्भात सुधारीत आदेश.

संदर्भ - १) मुंबई न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्र. cri.P.I.L.No.4/2013 च्या संदर्भात देण्यात आलेले दि.१७/१२/२०१३ रोजीचे आदेश

२) विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचे इंग्रजी परिपत्रक क्रं.५९-१२/एमआयएससी/२०१३/अे-ब्रॅच, दिनांक ३१/१२/२०१३

मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दि.१७/१२/२०१३ व दि.२१/१२/२०१३ रोजी याचिका क्र.cri.P.I.L.No.4/2013 च्या संदर्भात निर्देश निर्गमित केले आहे. सदर निर्देश हे जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३(३) व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम ९(३) म्हणजेच जन्म-मृत्यू घटनांच्या उशिरा नोदणी संदर्भात आहेत. न्यायालयाच्या या आदेशाची प्रत आपल्या सुलभ संदर्भासाठी सोबत जोडली आहे.

या आदेशाच्या अधीन राहून विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी दि.३१/१२/२०१३ रोजी परिपत्रक निर्गमित केलेले आहे. सदर परिपत्रकाची प्रत सुध्दा सोबत जोडली आहे.

सद्य:स्थितीत जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३(३) व त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी नियम २००० मधील नियम ९(३) अनुसार जर एखादी जन्म अथवा मृत्युची घटना,घडल्यापासून एक वर्षाच्या आत नोंदणी झाली नसेल, तर त्या कार्यक्षेत्रातील कार्यकारी दंडाधिकारी यांच्या आदेशाने नोंदणी करण्यात येते.

<u>परंतु यापुढे</u> न्यायालयाचे आदेश व तसेच विधी व न्याय विभागाच्या परिपत्रकानुसार ज्या जन्म-मृत्यू घटनांची नोंदणी घटना घडल्यापासून एक वर्षाच्या आत झाली नसेल, अशा घटनांच्या नोंदणीसाठी

फक्त प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकारी किंवा महानगर दंडाधिकारी यांचेच आदेश ग्राह्य धरण्यात यावेत. यासाठी हे आदेश प्राप्त करुन घेण्यासाठी नागरिकांना अशा न्यायालयात अर्ज करावे लागतील.

त्यापूर्वी निबंधकांनी त्यांचे कार्यक्षेत्रात घडलेल्या घटनेची नोंद नसल्याबाबत (खात्री करुन) अनुपलब्धता दाखला नमुना क्र.१०(अ/ब) मध्ये पूर्वीप्रमाणेच द्यावा व सदरील दाखला न्यायालयात अर्ज करतेवेळी अर्जासोबत पुरावा म्हणून जोडण्याच्या सूचना नागरिकांना दयाव्यात.

तरी आपण आपल्या अधिपत्याखालील सर्व निबंधक व उपनिबंधक यांना या महत्वाच्या परिपत्रकाबाबत अवगत करुन ही बाब निदर्शनास आणावी.

आपण केलेली कार्यवाही या कार्यालयास अवगत करावी.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१) मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई-३२.

२) मा. संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु,महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००१